# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
# राज्य सेवा मुख्य परीक्षा-२०१८
# घोषणा

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे दि. १८, १९ व २० ऑगस्ट, २०१८ रोजी घेण्यात आलेल्या **राज्य सेवा मुख्य परीक्षा-२०१८** च्या एकूण १३६ पदांचा अंतिम निकाल संबंधित उमेदवारांनी अर्जात केलेल्या दाव्यांच्या अनुषंगाने त्यांची पात्रता शासन स्तरावर मूळ प्रमाणपत्रांवरुन तपासण्याच्या अटीच्या अधिन राहून दि. १४ फेब्रुवारी, २०१९ रोजी जाहीर करण्यात आला आहे.

२. सदर परीक्षेमध्ये **सोलापूर** या जिल्हयातील **श्री. बारकुल आशिष नरहरि** बैठक क्रमांक **PN003216** हे राज्यातून सर्वसाधारण वर्गवारीमधून प्रथम आले आहेत व **सोलापूर** या जिल्हयातील **श्री जमदाडे महेश दत्तात्रय** बैठक क्रमांक **PN001423** हे मागासवर्गवारीतून प्रथम आले आहेत. तसेच महिला वर्गवारीतून **पुणे** या जिल्हयातील **श्रीमती दाभाडे स्वाती किसन** बैठक क्रमांक **PN004187** हया राज्यात प्रथम आल्या आहेत.

३. उमेदवारांच्या माहितीसाठी प्रस्तुत निकाल व प्रत्येक प्रवर्गाकरिता शिफारसपात्र ठरलेल्या शेवटच्या उमेदवाराचे गुण **(cut off marks)** आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले आहेत.

४. राज्य सेवा (पूर्व) परीक्षा-२०१८ दि. ८ एप्रिल, २०१८ रोजी मुंबईसह अन्य ३७ जिल्हाकेंद्रावर घेण्यात आली होती. प्रस्तुत परीक्षेच्या पूर्व परीक्षेकरिता १९६६९५ उमेदवारांना प्रवेश देण्यात आला होता. सदर परीक्षेमधून राज्य सेवा (मुख्य) परीक्षेकरिता २३८१ उमेदवार अर्हताप्राप्त ठरले होते. प्रस्तुत मुख्य परीक्षा दि.१८, १९ व २० ऑगस्ट, २०१८ रोजी मुंबई, औरंगाबाद, नागपूर व पुणे येथे घेण्यात आली होती. लेखी परीक्षेच्या निकालाच्या आधारे मुलाखतीसाठी ४२७ उमेदवार अर्हताप्राप्त ठरले.

५. दिव्यांग व्यक्तीसाठी राखीव असलेल्या पदांसाठी शिफारसपात्र ठरलेल्या उमेदवारांनी शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक अप्रकि-२०१२/प्र.क्र.२१७/आरोग्य-६, दिनांक ६ ऑक्टोबर, २०१२ मधील आदेशानुसार SADM या नविन संगणक प्रणालीव्दारे वितरीत करण्यात आलेल्या नवीन नमुन्यातील दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य राहिल.

६. प्रस्तुत परीक्षेचा निकाल समांतर आरक्षणाच्या व इतर अन्य मुद्यांच्यासंदर्भात विविध मा. न्यायालयात / मा. न्यायाधिकरणात दाखल करण्यात आलेल्या न्यायिक प्रकरणातील अंतिम न्याय निर्णयाच्या अधीन राहून जाहीर करण्यात आला आहे.

७. प्रस्तुत अंतिम निकालात शिफारसपात्र न ठरलेल्या ज्या उमेदवारांना त्यांच्या उत्तरपुस्तिका / उत्तरपत्रिकेतील गुणांची पडताळणी करावयाची आहे, अशा उमेदवारांनी गुणपत्रके प्रोफाईल मध्ये पाठविण्याच्या दिनांकापासून १० दिवसांत आयोगाकडे ऑनलाईन पध्दतीने विहित नमुन्यात अर्ज करणे आवश्यक आहे. (कृपया आयोगाच्या संकेतस्थळावरील उमेदवारांना सर्वसाधारण सूचनेतील सूचना क्रमांक ३.८ पहावी.)

दिनांक: १४ फेब्रुवारी, २०१९
ठिकाण : मुंबई.

**सचिव**
महाराष्ट्र लोकसेवा आयोग